### प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 13 Issue 5 February 2021 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद
(मार्च २००२ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

उन्हाळा आला आहे. वारा शांत आहे. झाडांखालील सावल्या आपल्याला खुणावतात, आपले स्वागत करतात, आणि आपल्याला आराम देतात.

एक नवीन हंगाम सुरू झाला आहे. आणि सर्व मानवता सौहार्दपूर्ण उन्हाळ्याची आशेने वाट पाहत आहे. आपण आशा करूया आणि प्रार्थना करूया.

जेव्हा मी तपोनगरातील नवीन हंगाम आणि महान आरंभांबद्दल बोलतो, तेव्हा माझ्याकडे लोक शंकास्पद नजरेने रोखून पाहतात. मला माहीत आहे की इथे लोकांमध्ये उणिवा आहेत. मी लोकांकडे पाहत नाही, तर भविष्याकडे; शक्यतांकडे पाहतो. मी ऊर्जांकडे पाहतो आणि ते काय करू शकतात ते पाहतो.

मी प्रकाशाला आणि जागृत आत्म्यांच्या भावी पिढ्यांना बघतो. आपण नेहमीच भविष्यासाठी काम करत असतो, आणि वर्तमान हा नेहमीच त्याचा पाया असतो.

ज्यांनी इथे येऊन राहण्याचे साहस केले आहे, त्यांनी एका महान आरंभाला हातभार लावला आहे. आता इतरांना पण योगदान द्यावे लागेल, हिम्मत करून या स्वप्नात सामील होण्यासाठी उडी मारून त्यांच्या स्वतःच्या पद्धतीने ह्यात भाग घ्यावा लागेल.

"डोअरवेज टु लाईट" वाचल्यानंतर सहसा लोक मला भेटण्याची इच्छा ठेवतात. बहुदा हे उत्सुकतेपोटी असतं. फार क्वचितच लोकं, ज्ञानाची आणि आध्यात्मिक अनुभवाची खरी भूक असल्यामुळे येतात. मी नेहमीच अशा काहींना भेटतो आणि उत्सुकतेपोटी येणाऱ्यांची गर्दी टाळतो.

'डोअरवेज' नंतर लोकांनी आमची इतरही पुस्तकं वाचावीत, उत्तरं शोधावी आणि त्यानंतरच उर्वरित प्रश्नांसह यावे.

मी व्यर्थ गोष्टी आणि चर्चेत व्यस्त राहण्याऐवजी लोकांना उच्च सत्यांकडे नेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात माझी शक्ती वापरू इच्छितो.

मला माहीत आहे, मी लौकिक स्वरूपाच्या गोष्टींमधून माझे लक्ष काढतो आहे. अधिक ध्यान करण्यासाठी, ऋषींच्या जवळ जाण्यासाठी, अधिक ज्ञान आणि ऊर्जा खाली आणण्यासाठी, ते गरजेचे आहे. मला माहीत आहे की माझ्या आजूबाजूचे लोक हे समजू शकतात. माझ्या हे लक्षात आले आहे की मी माझ्या विद्यार्थ्यांची सूक्ष्म पातळीवर जास्त चांगल्या पद्धतीने मदत आणि मार्गदर्शन करू शकतो. याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे.

आणखी एक शिवरात्र; परत जागरण. परंतु किती जणांना ठाऊक आहे की भगवान शिव खरोखर खाली येतात आणि आपण त्यांच्याशी संवाद साधू शकतो आणि ध्यानामध्ये त्यांचा अनुभव घेऊ शकतो?

आपल्याला बुद्धीचा अडथळा बाजूला ठेवून वास्तवाच्या गूढ खोल भागामध्ये शिरावे लागेल. आपल्याला जागृत व्हावे लागेल. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

बंगलोर शहरातील केंद्रांमध्ये होणारे ध्यान वर्ग रद्द राहातील. कोरोना विषाणूचा फैलाव आणि लस व औषध उपलब्ध होण्यास लागणारा वेळ लक्षात घेता, असे ठरविण्यात आले आहे की बंगलोर शहरातील केंद्रांमध्ये मार्च २०२१ पर्यंत वर्ग होणार नाहीत. एप्रिल २०२१ पासून पुन्हा वर्ग सुरू करण्याचा निर्णय तेव्हाच्या परिस्थितीनुसार घेण्यात येईल.


रविवारच्या वर्गांच्या वेबकास्टद्वारे ऑनलाईन वर्ग सुरू राहातील. प्राथमिक पातळीचे वर्ग देखील दर रविवारी सकाळी १० ते ११ पर्यंत ऑनलाईन घेतले जात आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी नवीन बॅच सुरू होते.

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/- ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.




### काही ठळक घडामोडी

- १ फेब्रुवारी २०२१ हा दिवस 'वर्ल्ड चॅनल्स डे' म्हणून साजरा केला जाईल. त्या दिवशी मानसा फाऊंडेशन येथील मेडिटेशन हॉलमध्ये प्रकाश प्रवहनाची सत्रे आयोजित करण्यात येतील. या सत्रांचे थेट वेबकास्ट www.lightagemasters.com/WCD2021-Live वर उपलब्ध केले जाईल. खालीलप्रमाणे तीन सत्रे आयोजित करण्यात येतील:
  भारतीय वेळेप्रमाणे सकाळी ८ वाजता-इंग्रजी मध्ये
  भारतीय वेळेप्रमाणे मध्यान्ह १२ वाजता-हिंदी मध्ये
  भारतीय वेळेप्रमाणे रात्री ९ वाजता-इंग्रजी मध्ये
  तुम्ही वरीलपैकी कोणत्याही एका किंवा सर्व सत्रांमध्ये आमच्यासह भाग घेऊ शकता आणि जगाला अधिक प्रकाश प्रवाहित करण्याच्या ह्या उदात्त प्रयत्नात सहभागी होऊ शकता. दिवसातील कोणत्याही सोयिस्कर वेळी ७ मिनिटे प्रकाश प्रवहन करून देखील तुम्ही आमच्यासह ह्यात भाग घेऊ शकता.
- ७ फेब्रुवारी २०२१ रोजी महर्षी अमरांची जयंती साजरी करण्यात येईल. सध्याच्या कोविड परिस्थितीमुळे ध्यानसाधकांना तपोनगरात एकत्र जमणे शक्य होणार नाही. विद्यार्थी प्रत्यक्ष होणाऱ्या वेबकास्टद्वारे ह्यात भाग घेऊ शकतील.
- २७ डिसेंबर २०२० रोजी सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत झालेल्या अखंड ध्यानात सुमारे ५० ध्यानसाधक संपूर्ण जगास प्रकाश प्रवाहित करून सहभागी झाले. इतर अनेक जणांनी तपोनगराशी मानसिक दुवा जोडून आणि आपापल्या घरून प्रकाश प्रवहन करून भाग घेतला.
- २०२१ सालातील शंबला गटातील सदस्यांची पहिली बैठक १० जानेवारीला आणि 'रा' गटातील सदस्यांची पहिली बैठक १७ जानेवारीला वेबकास्टद्वारे झाली. ■

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | सोमवार | महर्षी अमर जयंती / वर्ल्ड चॅनल्स डे |
| ०५ | शुक्रवार | कृष्णाष्टमी |
| ०७ | रविवार | महर्षी अमर जयंती कार्यक्रम |
| १० | बुधवार | शिवरात्री |
| ११ | गुरुवार | अमावास्या |
| १९ | शुक्रवार | रथसप्तमी |
| २० | शनिवार | शुक्लाष्टमी |
| २२ | सोमवार | शुक्ल दशमी |
| २७ | शनिवार | पौर्णिमा |

### तपोनगरातील कार्यक्रम

सध्या सर्व कार्यक्रम फक्त वेबकास्टद्वारे आयोजित करण्यात येत आहेत आणि तपोनगरमध्ये कार्यक्रमांसाठी लोकं एकत्र जमत नाही आहेत.

दर रविवारी – व्याख्यान, सकाळी ११ ते मध्यान्ह १२ पर्यंत
– प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

### महर्षी अमरांच्या जयंती निमित्त कार्यक्रम

रविवार, ७-२-२०२१ रोजी

| | |
|---|---|
| ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | विशेष ध्यान |

रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई-मेल द्वारा संपर्क साधावा.

गुरुजींचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

## एक गूढवादी गुरू

मनोज चोप्रा, अनुवाद : वैशाली जोशी

महर्षी अमर हे अनेक वेगवेगळ्या पृथ्व्या व तारामंडळांतून सतत सूक्ष्म देहाने प्रवास करीत असत. ऋषींनी त्यांना नेमून दिलेली अनेक कठीण व रोमहर्षक कार्ये त्यांनी पार पाडली. ते ऋषींच्या सर्वोत्कृष्ट कार्यकर्त्यांपैकी एक होते. गुरुजी सांगत असत की त्यांची कार्ये भविष्यातील पुराणे होतील. असे सर्व असूनही, ते आपल्यापैकी एक असल्यासारखे सामान्य जीवन जगले. ते मुलांसोबत खेळत असत आणि क्रिकेटचा आनंद घेत असत. संतुलित जीवनाचे ते एक उत्तम उदाहरण होते.

तपोनगरसाठी त्यांचे एक स्वप्न होते आणि आपण सर्वजण त्यांच्या स्वप्नाचा एक भाग आहोत. तपोनगर हे पृथ्वीवरील शंबलासारखे होईपर्यंत आणि आपल्या सर्वांना ऋषीत्व मिळेपर्यंत त्यांचे कार्य पूर्ण होणार नाही. ह्या संक्रमणाच्या काळात महर्षी अमरांची आपल्या पृथ्वीवर एक महत्त्वपूर्ण भूमिका आहे. वैयक्तिक आणि जागतिक पातळ्यांवर लोकांच्या जाणिवेत होणाऱ्या मोठ्या बदलांसाठी ते कार्य करीत आहेत.

आम्हाला नेहमी असे वाटते की ते भौतिक पातळीवर असताना आम्ही त्यांना भेटायला हवे होते. पण आपण सर्वजण उच्च पातळीवर महर्षी अमरांपर्यंत पोहोचू शकतो. ते फक्त एका विचाराच्या अंतरावर आहेत. ते आपल्या सर्व समस्यांसाठी आपल्याला मदत करण्यास तयार असतात. आपण प्रगती करो किंवा न करो, आपण त्यांचा एक भाग आहोत. आपल्यासाठी असलेले त्यांचे प्रेम मानवी दृष्टीकोनातून समजून घेता येत नाही. गुरुजींसारख्याच, त्यांच्या देखील कोणाबद्दल तक्रारी नव्हत्या. ते नेहमी म्हणायचे, “मी माझे कर्तव्य केले आहे, आणि बाकी माझा स्वीकार करायचा की नाही हे लोकांवर अवलंबून आहे.”

मानसातील उपक्रमांच्या पाठीशी असलेली प्रेरक शक्ती महर्षी अमर आहेत. वर्ल्ड चॅनल्स डे च्या पाठीशी असलेली प्रेरणा ते आहेत. दर वर्षी मानसा फाऊंडेशन महर्षी अमरांची जयंती संपूर्ण भारतातील अनेक शैक्षणिक संस्थांतून प्रकाश प्रवहनाची सत्रे आयोजित करून साजरी करते. ह्या वर्षी मानसा फाऊंडेशन मधे होणाऱ्या प्रकाश प्रवहनाच्या सत्रांचे संपूर्ण जगभरात वेबकास्ट करून आपण एक पाऊल पुढे टाकत आहोत. ही महर्षी अमरांसाठी एक विशेष भेट असेल.

त्यांचे कार्य अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यांनी वचन दिले होते की त्यांचे कार्य पूर्ण करण्यासाठी ते पुन्हापुन्हा ह्या पृथ्वीवर येतील. आपल्या आचरणातून त्यांना प्रकट करून, प्रेम, शांती आणि आशा प्रकट करून आपण त्यांच्या कार्यात सहभागी होऊया. ■

## महर्षी अमर – आपले मार्गदर्शक प्रकाश

सुनील बिसरहळ्ळी, अनुवाद : वैशाली जोशी

अनेक वेळा आपण, आपण घेतलेल्या निर्णयांच्या प्रचंडतेबद्दल अनभिज्ञ असतो. जेव्हा आपल्या जीवनात काही बदल घडवून आणण्यासाठी आपण ध्यानसाधना सुरू करतो, तेव्हा असेच घडते. नकळतपणे, गुरुजी, महर्षी अमर आणि ऋषी आपल्या जीवनाचा भाग बनतात आणि आपल्यासमोर एक संपूर्ण नवीन जग उघडते.

महर्षी अमरांनी आपल्या जीवनात प्रवेश करणे ही आपल्या बाबतीत घडलेली सर्वात चांगली गोष्ट आहे. ऋषींचा वारसा, अनादी व असीमित ज्ञान, पूर्ण सरलीकृत तंत्रे आणि आपल्या ध्येयांपर्यंत पोहोचण्याचा खात्रीशीर मार्ग ते त्यांच्या सोबत घेऊन आले आहेत.

एखाद्या दिव्याच्या प्रकाशाचा सौम्यपणा किंवा हजारो सूर्यांचे तेज, महर्षी अमर हे दोन्ही असू शकतात. ते देवांशी बोलू शकत होते, ऋषींसाठी कार्य करू शकत होते, कोर्टातील खटल्यांमध्ये हजर राहू शकत होते आणि चहाच्या कपासह क्रिकेटच्या सामन्याचा आनंद देखील घेऊ शकत होते.

त्यांना कधीही प्रकाशझोतात राहाणे आवडले नाही. त्यांनी पार्श्वभूमीवर राहून कार्य केले आणि त्याचे सर्व श्रेय ऋषींना आणि देवांना दिले. ते नम्रपणे म्हणत, “मी ऋषींचा कार्यकर्ता आहे.” त्यांच्यातील ह्या महान गुणवत्तेमुळे सूक्ष्म जगात सर्व जण त्यांचा खूप आदर करतात.

संत एकनाथ असो किंवा महर्षी अमर असो, ज्ञानाचे सरलीकरण करून सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यात ते निष्णात होते. महर्षी अमरांचे व्यक्तिमत्व गहन आणि उत्कट स्वरूपाचे होते. एकदा जेव्हा मी गुरुजींना विचारले की आम्ही जसे त्यांच्याशी विनोद करायचो तसे ते महर्षी अमरांशी करत होते का, ते म्हणाले, “आम्ही कधीही त्यांच्याशी विनोद केला नाही. ते देव आणि ऋषींबद्दल बोलताना खूप गंभीर असत. आम्हाला त्यांची भीती वाटत असे.”

त्यांनी कधीही निष्काळजीपणे टीका केली नाही किंवा विचार न करता बोलले नाहीत. ते नेहमी ऋषी, देव आणि आध्यात्मिकतेविषयी बोलत असत. ते हे देखील म्हणाले, “आध्यात्मिकतेच्या छत्रीखाली आश्रय घ्या.” आम्ही सर्व कृतज्ञ आहोत की आम्ही महर्षी अमरांच्या आश्रयाखाली आहोत.

महर्षी अमर आमच्यावर करत असलेल्या ऊर्जा, ज्ञान, प्रेम आणि संरक्षणाच्या वर्षावाने आम्हाला जो आत्मविश्वास मिळतो आहे त्यामुळे महामारीच्या कठीण काळात सुद्धा आम्ही हसत आणि नाचत गात आहोत. महर्षी अमरांनी आपल्या जीवनात जे आणले आहे ते अपरिमित आहे. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी, आपल्या अंत:करणातील चळवळ आहे. ही एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत, घोषणा फलक नाहीत, जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाश करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या ह्रदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांतील अंध:काराला दूर करतो. त्यामुळे लोकांमध्ये परिवर्तन घडते. लोकांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूळ स्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्ज्वल भविष्य, आणि तो दिसत नसला तरी सर्वव्यापी आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगात परिवर्तन घडवूया.

प्रकाश प्रवाहित करून पसरवण्यासाठी, तुमच्या वर प्रकाशाच्या एका महासागराची कल्पना करा. मग कल्पना करा की, ह्या महासागरातून प्रकाशाचा एक झोत खाली अवतरत आहे आणि हा प्रकाश तुमच्या शरीरात प्रवेश करून त्याला पूर्णपणे भरतो आहे. एका मिनिटासाठी या प्रकाशाचा अनुभव घ्या. मग कल्पना करा की, हा प्रकाश तुमच्या शरीराबाहेर पडून हळूहळू तुमच्या घरात, मोहल्ल्यात, देशात आणि संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी सप्त ऋषींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवावा, ही विनंती.

वेब साईट: www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबलामध्ये राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या ऐहिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

जून २००६

मागच्या वेळी हा मुद्दा विचारण्यात आला होता – अत्यंत अवास्तव आणि मगरूर असलेल्या माणसाशी आपण कसे वागावे? आपल्याला अशा व्यक्ती भेटतात आणि आपण त्यांच्याशी कसे वागावे? लक्षात ठेवा तुम्ही एक ध्यानसाधक आहात. नेहमीच प्रकाश सोबत बाळगा. जेव्हा तुम्हाला तुमच्या आत असलेल्या प्रकाशाची जाणीव असेल, तेव्हा तुम्हाला खूप सामर्थ्यवान असल्यासारखे वाटेल. कदाचित तुम्ही गप्प राहाल, तुम्ही काहीही बोलणार नाही. तुम्ही कोणत्याही शब्दांनी प्रत्युत्तर देणार नाही, पण तुमच्यातील बल स्पंदित होईल. त्याने फरक पडेल. तुम्ही यासारखा प्रयोग करू शकता. लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही बरोबर असता, तेव्हाच तुम्ही बलवान असता. जेव्हा तुम्ही बरोबर असता, तेव्हा तुमचे मौनच असर करते. जेव्हा तुम्ही बरोबर असता, तेव्हा तुम्हाला परमेश्वराकडून आणि ऋषींकडून पूर्ण मदत, संरक्षण आणि समर्थन मिळते. म्हणूनच हे साधे तंत्र इतके महत्त्वपूर्ण आहे – तुमच्यातील प्रकाशाची जाणीव ठेवणे. जसजशी तुम्हाला प्रकाशाची अधिक जाणीव होत जाते, तसतसा प्रकाश तुमचा सांगाती बनतो. तुम्ही ह्याचा सराव केला पाहिजे आणि अनुभव घेतला पाहिजे. हा सांगाती, हा दिव्य मार्गदर्शक आपल्याला स्पष्टपणे सांगतो, तुम्ही कसे वागले पाहिजे, तुम्ही कशाप्रकारे कृती केली पाहिजे, बोलले पाहिजे आणि परिस्थिती हाताळली पाहिजे. तुम्ही हे करून पाहा, मग तुम्ही कधीही अपयशी होणार नाही. मी हे करून पाहिले आहे आणि मी कधीही अपयशी झालो नाही. जेव्हाकेव्हा मला आडमुठ्या लोकांना आणि बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागले, तेव्हा माझ्यासाठी तक्रार आणि कुरकुर करत राहणे सोपे होते. मी बरोबर होतो आणि ते चुकीचे होते, पण मी गप्प राहिलो. नंतर, अनेक वर्षांनंतर लोकं म्हणाले, "हा माणूस सामर्थ्यवान होता, पण त्याने कधी कुरकुर देखील केली नाही." त्यासाठी खूप संयम असणे आवश्यक आहे. मला इतके सामर्थ्यवान कशाने बनवले? मला ह्या तंत्राबद्दल माहिती नव्हती, पण मला वाटते की माझे गुरू माझ्या सोबत होते. माझे गुरू तेव्हा माझ्या सोबत होते आणि आताही माझ्या सोबत आहेत.

जीवनातील अशा परिस्थितींना सामोरे जाण्यास आपले मार्गदर्शन करण्यासाठी शब्दकोश किंवा सिद्ध गणक असू शकत नाही. प्रत्येक परिस्थिती वेगळी असते. जीवन गुंतागुंतीचे असते आणि लोकं जटिल असतात. कदाचित एक व्यक्ती एकाच दिवशी दहा वेगवेगळ्या पद्धतींनी वागेल! तुम्ही जर बरोबर असाल, तुम्ही जर सामर्थ्यवान असाल तर त्यांच्याशी कसे वागावे हे तुम्हाला समजेल. तुम्ही जर प्रकाशाशी जोडलेले असाल, तर तुम्ही कोणत्याही परिस्थितीत कोणासोबतही योग्यपणे वागू शकाल. म्हणूनच मी पुन्हापुन्हा हजारो वेळा सांगतो, पुन्हापुन्हा सांगण्यास माझी अजिबात हरकत नाही, "प्रकाशाला तुमचा सांगाती बनवा." तुम्हाला काय बोलावे, काय बोलू नये, काय स्वीकारावे, कशाचा स्वीकार करू नये हे समजेल आणि तुम्ही नेहमी शांत आणि स्थिरचित्त राहाल. हे करून पाहा.

जीवनात ध्येय ठेवण्याबद्दल मी अनेक वेळा बोललो आहे. आध्यात्मिक साधनेत देखील आपले ध्येय असले पाहिजे. आपण एका ध्येयापासून सुरुवात करतो, पुढे ते ध्येय विस्तारित होऊ शकते, आणि ध्येय हे विस्तारित झालेच पाहिजे. मी केवळ माझ्या समस्या सोडवण्यासाठी ध्यानसाधना सुरू केली आणि माझ्या समस्या नाहीशा झाल्या, आणि अजूनही मी इथे आहे. मी खूप आनंदी आहे. माझी ध्येये विस्तारित झाली. आपण एक ध्येय ठेवून सुरुवात केली पाहिजे, आपले एक ध्येय असलेच पाहिजे आणि आपण आपली भूमिका देखील समजून घेतली पाहिजे – हे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या कुटुंबात, कामाच्या ठिकाणी, समाजात, इथे साधक म्हणून, ध्यानसाधक म्हणून, स्वयंसेवक म्हणून आपली काय भूमिका आहे? आपल्याला हे माहीत असणे आवश्यक आहे. आपल्याला जर आपली भूमिका समजली, तर आपण कधीही आपल्या जबाबदाऱ्या टाळणार नाही. मी तुम्हाला ह्या मुद्द्यावर चिंतन करू देईन. मी ह्या भूमिकेचे दोन महत्त्वपूर्ण पैलू सांगतो. जेव्हा आपल्याला आपली भूमिका कळते, तेव्हा आपण काय केले पाहिजे हे आपल्याला समजते. आपल्या पालकांसाठी, आपण ज्या संस्थेत काम करतो त्या संस्थेसाठी, ऋषींसाठी आणि आपल्या स्वतःच्या साधनेप्रती आपली काय कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आहेत हे आपल्याला समजते. दुसरा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे आपण काय करू नये. उत्साहाचा कधीकधी अतिरेक होतो. ज्या गोष्टी आपण करण्याची आवश्यकता नाही त्या गोष्टी आपण करण्याचा प्रयत्न करू शकतो. जरूरी असेल त्यापेक्षा जास्त किंवा कमी न करण्यात परिपूर्णता आहे. म्हणून भूमिका समजून घेणे फार महत्त्वाचे आहे, विशेषतः साधनेत. जेव्हा मला माहीत आहे की मी एक गुरू आहे, तेव्हा मला माझ्या जबाबदाऱ्यांची जाणीव असते. मला माहीत आहे, इथे जबाबदाऱ्यांना अजिबात कोणतीही मर्यादा नाही. मी माझ्या मनाची द्वारे नेहमीच सर्वांसाठी उघडी ठेवली पाहिजेत आणि माझ्या गुरूंना समजून घेतले पाहिजे. मी असे म्हणू शकत नाही, "मी तुम्हाला बोध दिले आहेत, मी तुम्हाला शिकवले आहे, मी तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत आणि माझे काम संपले आहे." लोकं स्त्रोताकडे, म्हणजेच परमेश्वराकडे परत जाईपर्यंत माझे काम कधीही संपणार नाही. ती एका गुरूची भूमिका आहे – याची मला जाणीव असली पाहिजे. एका विद्यार्थ्याला ही जाणीव असली पाहिजे की तो एक विद्यार्थी आहे आणि अद्याप तो गुरू नाही. तरच तो शिकेल. किमान तो गुरूला शिकवण्याचा प्रयत्न करणार नाही! जेव्हा कुटुंबातील माझी भूमिका मला समजेल, तेव्हा मी कधीही माझ्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करणार नाही. कुटुंबातील सदस्य कधीही तक्रार करणार नाहीत, त्यांना कधीही भीती वाटणार नाही की हा मनुष्य संसार त्याग करून संन्यासी होईल! तर एक ध्येय ठेवा आणि तुमची भूमिका जाणून घ्या.

एक सूक्ष्म मुद्दा देखील आहे. बऱ्याच वेळा गोष्टी आपल्याला हव्या तशा घडतात, विशेषतः तेव्हा, जेव्हा आपण ह्या आध्यात्मिक मार्गांचा वापर करतो, जसे की परमेश्वराशी जोडलेले असणे. पण कधीकधी गोष्टी आपल्याला हव्या तशा घडत नाहीत. आपल्याला वाटते की आपण अपयशी झालो आहोत कारण आपल्याला हवी होती तशी निष्पत्ती आपल्याला मिळाली नाही. अशा वेळी आपण प्रकाशाचा जास्त सल्ला घेतला पाहिजे, प्रकाशाचे जास्त ऐकले पाहिजे. प्रकाश आपल्याला सांगेल की ह्या वेळी अपयश मिळणे हीच योग्य गोष्ट आहे. जेव्हा मी माझ्या गुरूंच्या कार्यात सामील झालो आणि जेव्हा मी मनोवतीत प्रवेश केला, तेव्हा मला खूप आनंद झाला होता. जेव्हा इतरांनी माझ्या गुरूंना सोडले, तेव्हा मी त्यांना चिकटून राहिलो. कदाचित माझ्या गुरूंनीच मला तिथून बाहेर आणले, माझ्या खूप परीक्षा घेतल्या. कदाचित त्या वेळी ते आवश्यक होते. ते अपयश नव्हते, ती त्या वेळी घडणारी योग्य गोष्ट होती. ■

# श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

१३-१२-२०२०

२०२० वर्ष हे आता संपायच्या मार्गावर आले सुद्धा आहे. महामारीचे हे वर्ष सुद्धा लवकर निघून गेले. जरी हे वर्ष खूप कठीण वर्ष होते, तरी सुद्धा एकाप्रकारे, हे संधींचे वर्ष होते. आपल्याला इथे या मार्गात राहून हे समजले आहे की समस्या देखील संधी असतात. नुकताच मी महान गुरू एखार्ट टोले यांचा व्हिडिओ पाहिला. ते म्हणतात की कुठलीही प्रतिकूल परिस्थिती, ही एक संधी सुद्धा असते. ते म्हणतात की सहसा वैयक्तिक किंवा जागतिक जागृती ही केवळ प्रतिकूलते नंतरच घडते, अर्थात त्या शिवाय जागृती घडू शकत नाही असे नाही. म्हणूनच ओढवलेल्या सर्व समस्यांकडे, सर्व विपरीत परिस्थितींकडे आपल्याला आध्यात्मिक देणग्यांच्या स्वरूपात पाहावे लागेल. मला मान्य आहे की असा विचार करणे सोपे नाही. जेव्हा आपण अडचणींमधून, कठीण प्रसंगातून जात असतो तेव्हा आपले संपूर्ण लक्ष आपल्यावर ओढवलेल्या संकटाकडे असते. आपल्यावर आलेल्या संकटाचे निराकरण हेच आपले ध्येय असते. ती समस्या आपल्या व्यक्तिमत्त्वाला, आपल्या चेतनेला वेढून घेते. अशा वेळी समस्या किंवा अडचणींना संधी समजून घेणे, किंवा तसा विचार करणे हे फार अवघड आहे. परंतु हे पण खरं आहे की प्रत्येक समस्येनंतर आपण काही प्रमाणावर सुज्ञ झालो असतो. कदाचित हे सुज्ञतेचे प्रमाण वेगवेगळ्या लोकांमध्ये वेगवेगळे असू शकते, पण आपली प्रगती नक्कीच झालेली असते.

या महामारीने या पृथ्वीवरील प्रत्येकाला प्रभावित केले. आपण असे ही म्हणू शकतो की ही वैश्विक समस्या होती. आणि जवळपास प्रत्येकासाठीच ही एकप्रकारची वैयक्तिक समस्या पण होती. काहींसाठी या समस्येची तीव्रता खूप होती तर काहींसाठी ती तेव्हढीशी बिकट नव्हती. जागतिक समस्या एकप्रकारे सामूहिक संधी निर्माण करतात. ही लोकांसाठी एकत्रितपणे प्रगत होण्यासाठी संधी होती. एकप्रकारच्या बदलासाठी, जागतिक चेतनेमध्ये, सामूहिक चेतनेमध्ये बदलासाठी ही एक संधी होती. बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी लोकांना अंतर्मुख व्हावे लागले. मला वाटतं प्रत्येकाला हा प्रश्न पडला असेल, "हे असं का घडतं आहे?" जेव्हा मोठ्या प्रमाणावर लोक अंतस्थ होतात, प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अंतर्मुख होतात, तेव्हा त्याचा आध्यात्मिक प्रभाव पडतो, त्याच्या परिणामस्वरूप सामूहिक जागृती घडते. जागतिक जागृतीची, सामूहिक जागृतीची ही प्रक्रिया सामर्थ्य गोळा करत आहे. नवीन युगाकडे आपली वाटचाल वेगाने होत आहे. अर्थात अनेक लोकांना त्रासातून जावे लागले आणि अजूनही बऱ्याच जणांचे दुःखांमधून जाणे सुरू आहे, आणि अशा गोष्टींसाठी साक्षी असणं खूप वेदनादायी आहे. परंतु नेहमी अशी आशा राहते की ही परिस्थिती बदलेल.

या संस्थेच्या दृष्टीकोनातून पाहता आम्हाला आमच्या बंगलोर शहरामधील केंद्रांमध्ये भरणाऱ्या ध्यानवर्गांना स्थगिती द्यावी लागली. इंटरनेटचे आभार की आम्ही वेबकास्टद्वारे हे ऑनलाइन वर्ग चालू ठेवू शकलो. आम्ही थेट इंटरनेट सत्राद्वारे प्रारंभिक वर्ग सुरू ठेवू शकतो आहोत. तपोवनात गुरुजींच्या समाधीचे नूतनीकरण पूर्ण करू शकण्यात आम्ही यशस्वी झालो. आव्हाने असूनही आम्ही सर्व कामे चालू ठेवू शकलो. हे कार्य चालू ठेवण्यामध्ये आमची मदत केल्याबद्दल आम्ही मास्टर्सचे आभारी आहोत.

प्रत्येक नवीन वर्ष नव्या ऊर्जा, नव्या संधी व नवी आशा घेऊन येते. मला आशा आहे की २०२१ हे वर्ष खूप छान असेल, जे आपल्याला नवयुगाच्या आणखी जवळ घेऊन जाईल.

मी मला माहीत झालेला एक अतिशय मनोरंजक शोध सामायिक करू इच्छितो. आमच्या विद्यार्थ्यांपैकी एकाने १९९७ मध्ये जर्मनीच्या एका विद्यापीठात केलेल्या प्रयोगाबद्दल आमच्या एका स्वयंसेवकाद्वारे एक लिंक मला पाठवली. या प्रयोगामध्ये एका ध्यानसाधकास पूर्णपणे बंद, अंधाऱ्या खोलीत ध्यान करण्यास सांगितले गेले. तेथे अजिबात प्रकाश प्रवेश करू शकत नव्हता. ध्यानाचे तंत्र होते – उपचाराची आवश्यकता असलेल्या व्यक्तीला प्रकाश पाठवणे. ध्यान करणारा, त्या दुसऱ्या व्यक्तीला बरे करण्यासाठी सतत प्रकाश पाठवत गेला. त्या ध्यानस्थ व्यक्तीच्या समोर एक अत्यंत संवेदनशील उपकरण ठेवले गेले होते जे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे जाणारे फोटान कण किंवा भौतिक प्रकाशाचे कण मोजू शकण्यास सक्षम होते. त्यावेळी त्यांना असे आढळले की ते उपकरण ध्यानस्थ माणसाच्या छातीतून प्रति सेकंदाला १००,००० फोटानचा प्रवाह दर्शवत आहे. जेव्हा ती व्यक्ती ध्यान करत नव्हती, उपचार करण्यासाठी प्रकाश पाठवत नव्हती, तेव्हा त्यांनी फोटानचा हा प्रवाह तपासला आणि तेव्हा त्यांना आढळले की ध्यानस्थ माणसाच्या छातीमधून येणारे प्रकाशाचे प्रमाण नगण्य आहे. ते केवळ २० फोटान प्रति सेकंद एव्हढेच होते. म्हणजे जेव्हा व्यक्ती ध्यान करत होती किंवा उपचारक ऊर्जा पाठवत होती, त्यावेळी उपकरणाने प्रति सेकंदाला १००,००० फोटान प्रवाहाची नोंद केली, आणि जेव्हा व्यक्ती ध्यान करत नव्हती त्यावेळी हे प्रमाण अगदीच नगण्य होते. हा खरोखर एक आश्चर्यकारक शोध आहे!

आपल्याला हे माहीत आहे की जेव्हा आपण इतरांना प्रकाश पाठवतो तेव्हा आपण भौतिक ऊर्जा नाही, तर एक अगदी सूक्ष्म ऊर्जा पाठवत असतो, आणि आपण हे मानतो की ती ऊर्जा मोजली जाऊ शकत नाही. परंतु गुरुजींनी आपल्याला सांगितले आहे की जेव्हा आपण प्रकाश प्रवाहित करतो तेव्हा आपले शरीर ट्रान्सफॉर्मरचे काम करत असते. त्यांनी सांगितले होते की जो प्रकाश आपण प्रवाहित किंवा चॅनल करतो, तो खूप सूक्ष्म असतो पण जेव्हा तो आपल्या शरीरात प्रवेश करून आपल्या शरीराच्या बाहेर पडतो तेव्हा तो किंचित स्थूल होतो, जेणेकरून लोकांना त्याला शोषून घेता यावे. अन्यथा वर नमूद केलेल्या प्रयोगामध्ये वापरण्यात आलेल्या उपकरणाला प्रकाशाची नोंद कशी करता आली? ती व्यक्ती एका डार्क चेंबरमध्ये बसली होती आणि चेंबरमध्ये प्रकाशाला येण्यासाठी कोणताही मार्ग नव्हता. परंतु जेव्हा ध्यानस्थ माणसाने तंत्राचा सराव केला तेव्हा फोटानच्या संख्येमध्ये वाढ झाली. हा एक अलौकिक प्रयोग आहे.

माझा हा विश्वास आहे की प्रकाशाच्या वारंवारतेत किंवा फ्रिक्वेंसीमध्ये होणारा हा बदल केवळ शरीराच्या पातळीवरच नव्हे तर मन आणि बुद्धीच्या पातळीवर पण होत असावा. आपले मन आणि बुद्धी ट्रान्सफॉर्मर बनून ऊर्जांना प्रसारित करत असावेत. ज्या लोकांना प्रकाश प्राप्त होतो, त्यांना सर्व स्तरांवर ऊर्जा मिळत असाव्यात. अशा प्रयोगांमुळे आपला विश्वास दृढ होतो आणि ज्या लोकांना वैज्ञानिक दृष्टिकोन आहे त्यांना यामुळे गोष्टी समजून घेण्यात मदत होते. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्षात ध्यान वर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी नोंदणी शुल्क २५०० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी १३०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क ४५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी आणि पाठ्यपुस्तकांची किंमत समाविष्ट आहे.

त्यानंतर, वार्षिक नूतनीकरण शुल्क, इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी ९०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क ३५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## एक आलौकिक गुरू

श्रुती सुधाकर, अनुवाद : वैशाली जोशी

अंबरीश वर्मा देसाई यांचा जन्म १ फेब्रुवारी १९१९ रोजी बंगलोर येथे कौजलगीच्या राजघराण्यात झाला होता. ते पृथ्वीवर वास्तव्य करणाऱ्या सर्वश्रेष्ठ ऋषींपैकी एक होते. जरी ते स्वतः एक महान ऋषी होते, तरीही त्यांनी नेहमीच स्वतःला 'ऋषींचा कार्यकर्ता' म्हणून संबोधित केले. ऋषींनी प्रेमाने त्यांना 'अमर' हे नाव दिले. बोललेल्या शब्दांशी अनुकूल कृती असणाऱ्या दुर्मिळ लोकांपैकी ते एक होते – त्यांनी प्रेम, विनम्रता आणि उच्च जीवनशैलीबद्दल स्वतः उदाहरण बनून शिकवले.

गुरुजी कृष्णानंद हे महर्षी अमरांचे पट्ट शिष्य होते. गुरुजी १९७७ साली महर्षी अमरांना भेटले आणि नंतर त्यांना महर्षी अमरांकडून कळले की मागील अनेक जन्मात ते महर्षी अमरांच्या सोबत होते.

महर्षी अमर इतरांचे लक्ष न वेधता पार्श्वभूमीवर राहिले आणि मुद्दाम प्रसिद्धीपासून दूर राहिले. एकदा राजदूताचे पद देण्यासाठी त्यांचा विचार केला गेला असता, त्यांनी ऋषींसह भौतिक आणि सूक्ष्म पातळ्यांवर असलेले त्यांचे कार्य चालू ठेवण्यासाठी ते पद नाकारले. त्यांच्या शक्तींचा वापर करून ते सहजपणे लोकांचा मोठा जमाव गोळा करू शकले असते, पण पुन्हा, ऋषींच्या परिषदेने त्यांना सोपवलेल्या कामावर त्यांचे लक्ष केंद्रित होते, आणि केवळ उत्सुकते पोटी आलेले प्रेक्षक गोळा केल्याने त्यांच्या कार्यात फक्त व्यत्ययच आला असता. तथापि, त्यांनी प्रामाणिक साधकांसाठी स्वतःला उपलब्ध ठेवले आणि हजारो लोकांना ध्यान शिकवले आणि हजारो साधकांना मुक्ती मिळविण्यात मदत केली. ते फक्त व्यक्तींचाच नव्हे तर राष्ट्रांचा आणि जगाचा देखील भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ जाणून घेऊ शकत होते.

गुरुजी ह्या महान गुरूंच्या सूक्ष्म जगातील साहसांशी परिचित होते. त्यांच्या "Astral Ventures of a Modern Rishi" ह्या पुस्तकात गुरुजींनी ह्या महान गुरूंच्या काही कार्यांविषयी आणि त्यांच्या सूक्ष्म जगातील साहसांविषयी नमूद केले आहे. पुस्तक वाचल्यानंतर काही लोकं आश्चर्यचकित झाले आणि काहींनी असेही उद्‌गार काढले की ह्या लहान पुस्तकात नमूद केलेले अनुभव एखाद्या साहसी-रोमांचक कथेपेक्षा काही कमी नाहीत.

त्यांच्या नावाप्रमाणेच, महर्षी अमर आपल्या अंतःकरणात अविनाशी आणि चिरंतन राहात आहेत आणि आजही साधकांसाठी उपलब्ध आहेत! ■

## एकमेव सत्य

अपूर्वा देशपांडे, अनुवाद : वैशाली जोशी

"मी त्याला ओळखत नाही. मी फक्त त्याचे नाव ऐकले आहे, आणि ते ऐकल्यावर माझे मन त्याच्यावर स्थिर झाले आहे." असे श्री रामकृष्ण भगवान श्रीकृष्ण यांच्यांबद्दल म्हणाले होते. आपल्याला माहीत असल्याप्रमाणे, महर्षी अमर हेच त्यांच्या आधीच्या जन्मात श्री रामकृष्ण होते.

मी पुढे वाचणे सुरू ठेवले पण माझ्या वाचनात आता यांत्रिकपणा आला होता. मी वाचत असलेल्या शब्दांची नोंद घेण्यास माझे मन नकार देत होते. माझे मन मागे श्री रामकृष्णांनी भगवान श्रीकृष्ण यांच्याबद्दल उच्चारलेल्या शब्दांकडे वळत होते; विशेषतः ते पहिले चार शब्द – "मी त्याला ओळखत नाही." ह्या महान गुरूंची विनम्रता शब्दांकित करण्यासाठी हे शब्द पुरेसे आहेत.

जेव्हाजेव्हा मी "Doorways to Light" हे पुस्तक वाचते, तेव्हा भगवान श्रीकृष्ण महर्षी अमरांना बरे करण्यासाठी त्यांच्या खोलीत प्रत्यक्ष आले होते, हे वाचताना माझ्या अंगावर अजूनही रोमांच उभे राहतात. भगवान श्रीकृष्णांनी महर्षी अमरांना आलिंगन दिले, हे जेव्हा मी वाचते, तेव्हा आपोआप माझ्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. गुरुजी आणि महर्षी अमरांसारखे महान गुरू नेहमीच परमेश्वराशी जोडलेले असतात आणि तरीही ते म्हणतात, "मी त्याला ओळखत नाही."

मी विचार करू लागले की, मी जर कधी भगवान श्रीकृष्णांना पाहिले, तर माझी प्रतिक्रिया कशी असेल. कदाचित संपूर्ण जगाने हे पाहावे म्हणून मी ही गोष्ट सन्मानाच्या बिल्ल्याप्रमाणे परिधान करेन, आणि जगाने जर ते पाहिले नाही, तर कदाचित मी प्रत्येक संभाषणात त्याविषयी बोलण्याचा मार्ग शोधेन. हेच मला एक सामान्य व्यक्ती बनवते आणि महर्षी अमरांना एक महान गुरू बनवते.

हे एक वाक्य कसे मला अनेक वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून विचार करायला लावते आहे, याबद्दल मला हसू आले. गुरुजींनी अनेक वेळा उल्लेख केला होता की महर्षी अमरांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द हा वेदासारखा होता. आपण महर्षी अमरांना केवळ गुरुजींच्या माध्यमातून भेटलो आहोत, तरीही आपले मन, आपला आत्मा, आपले संपूर्ण व्यक्तित्व "त्यांच्यावर स्थिर" झाले आहे. कदाचित गुरुजींच्या महर्षी अमरांसाठी असलेल्या संसर्गजन्य प्रेमाने आपल्याला महर्षी अमरांच्या प्रेमात पडायला लावले आहे.

आपण त्यांना भेटलेलो नाही, पण त्यांचा शब्द हे पूर्ण सत्य आहे. आपण त्यांना भेटलेलो नाही, पण आपल्याला किंचित देखील शंका नाही, की महर्षी अमर जे बोलले होते तेच सत्य, एक उच्च सत्य, एकमेव सत्य आहे. ■

## प्रश्नोत्तरे

(श्री. जयंत देशपांडे)
संकलन : शोभा राव, अनुवाद : अपर्णा रोपलेकर

**प्र: जेव्हा आपण शेळ्यांची पैदास करतो, तेव्हा आपण कर्म गोळा करतो का?**

उ: असे लोक आहेत जे शेळ्यांची पैदास करतात आणि मग त्यांची विक्री करतात, त्यांना खूप चांगल्या प्रकारे माहीत असते की त्या शेळ्यांची कत्तल होणार आहे. असे असले तरी ते कर्म गोळा करतात असे मला वाटत नाही. कारण ते, ही गोष्ट त्यांच्या स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी करत असतात. हा एक व्यवसाय आहे. गुरुजींनी सुद्धा सांगितले होते की खाटिक त्यांच्या व्यवसायामुळे कर्म गोळा करत नाहीत.

**प्र: ऋषी आपल्या प्रार्थनेची उत्तरे कशी देतात? आणि आपली प्रार्थना ऐकली जाते हे आपल्याला कसे कळेल? आणि बरेच प्रयत्न आणि सतत प्रार्थना केल्यानंतरही जर परिस्थितीत बदल होत नसेल तर आपण काय करायला हवे?**

उ: प्रार्थना नेहमीच ऐकल्या जातात. गुरुजी नेहमी सांगत की, आपली कुजबूजही देव ऐकतो. जरी आपण प्रार्थना केली नाही, तरीही तो आपल्या गरजा जाणतो आणि तो आपल्याला मदत करतो. आपण जास्त ध्यान करायला हवे व जास्तीत जास्त सकारात्मक व्हायला हवे. आपण अधिक प्रयत्न करायला हवेत आणि धीर धरायला हवा. योग्य वेळी परिस्थिती नक्कीच बदलेल.

**प्र: सोडून गेलेल्या व्यक्तीच्या आत्म्याने दुसऱ्या रूपात जन्म घेतला असेल, तर त्या आत्म्याला पाठवलेले प्रेम व ऊर्जा त्यापर्यंत पोहोचतात का?**

उ: आत्म्याने दुसरा जन्म घेतला असला तरीही, त्याला पाठवलेले प्रेम व ऊर्जा त्याच्यापर्यंत पोहोचतात. या बाबतीत गुरुजींनी सांगितले होते की, पितृदेवता त्या ऊर्जा नेतात आणि आत्मा कुठेही असला तरी त्याच्यापर्यंत त्या पोहोचवतात.

**प्र: माणसाच्या मृत्युनंतर जेव्हा दहा दिवस आत्मा इथे असतो, तेव्हा तो आत्मा लोकांच्या संपर्कात येऊ शकतो का आणि त्याच्या प्रियजनांना त्रास देऊ शकतो का?**

उ: यमलोकातून आलेले मार्गदर्शक अशा गोष्टी घडू देत नाहीत. पण मला विश्वास आहे की, जेव्हा मृत्युनंतर दहा दिवस आत्मा इथे असतो, तेव्हा एखादी व्यक्ती अत्यंतिक प्रेमाने त्या आत्म्याशी संपर्क साधू शकते. प्रेमाने सर्वकाही शक्य होते.

जेव्हा गुरुजींना ओळखणाऱ्या काही व्यक्तींनी त्यांचे देह सोडले, तेव्हा गुरुजी त्यांच्या आत्म्यांशी बोलले होते. कधीकधी, क्वचित थोड्या प्रसंगी, जेव्हा साधकांना दहा दिवसांच्या कालावधीनंतर दिवंगत आत्म्यांशी संवाद साधायचा होता, तेव्हा ते गुरुजींच्या माध्यमातून असे करू शकले. अशा गोष्टी करणे फक्त ऋषींना शक्य आहे, आणि फक्त तेव्हाच जेव्हा काही उच्च स्वरूपाचे कारण असेल. साधारणपणे आत्मे शरीर सोडल्यावर आनंदित असतात. त्यांना सूक्ष्म पातळीवर अनेक गोष्टींची जाणीव होते. सूक्ष्म पातळीवरील अनेक सत्ये त्यांना कळतात आणि मग त्यांना या पृथ्वीवरील स्थूल गोष्टींशी घेणेदेणे नसते.

**प्र: इतरांनी जाणूनबुजून आपल्याशी चुकीचे वर्तन केले तर आपण त्यांच्यावर रागावणे योग्य आहे का?**

उ: हो बरोबर आहे. मला वाटते आपण अन्यायाविरुद्ध रागावलेच पाहिजे. आपण तो राग व्यक्त करू शकू किंवा नाही, हा वेगळा भाग आहे. पण आपल्याला राग आलाच पाहिजे. आणि आपण त्या व्यक्तीचा नव्हे, तर अन्यायाचा मानसिकरित्या अस्विकार केला पाहिजे.

**प्र: सोलमेट्सनी लग्न करणे आवश्यक आहे का? ते समान वयाचे असतात का?**

उ: साधारणपणे सोलमेट्स भेटतात व लग्न करतात. त्यांनी अगदी समान वयाचे असणे गरजेचे नाही.

**प्र: कधीकधी एखाद्या व्यक्तीचे लग्न त्याच्या किंवा तिच्या सोल मेट व्यतिरिक्त इतर कोणाशी होऊ शकते का? असे घडते का?**

उ: आपल्याला गुरुजींकडून हे समजले आहे की, साधारणपणे सोलमेट्स भेटतात आणि लग्न करतात, पण ह्याला अपवादात्मक परिस्थिती असू शकते, जेव्हा एकतर ते लग्नच करत नाहीत किंवा कुणा दुसऱ्याबरोबर लग्न करतात.

**प्र: वैश्विक स्तब्धता म्हणजे काय?**

उ: ह्या सूर्यमालेच्या गाभ्यात स्तब्धता आहे. तसेच, ह्या आकाशगंगेच्या गाभ्यातही स्तब्धता आहे. त्याचप्रमाणे, ह्या विश्वाच्या गाभ्यातही स्तब्धता आहे. शक्य आहे की विश्वाच्या गाभ्यातील ह्या स्तब्धतेलाच वैश्विक स्तब्धता म्हणत असावेत. ■


### आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| Master-Pupil Talks - Vol 2 | 75/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 1 & 4 | each 200/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 2 & 3 | each 250/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्‌गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |


### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपूर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

Published: 21st of Every Month. RNI. No. KARMAR/2008/27314 Regd. Postal Regn. No. KRNA/BGE/1125/ 2020-2022
Date of posting Newsletter-25th or 27th or 29th of Every Month. Posted at Bangalore PSO, Bg-560026 No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### तपोनगर

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे ''मानसी'' नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

एके दिवशी ध्यान करण्यास सुरुवात करण्या अगोदर मी खूपच भावूक झाले होते. मला आता नक्की आठवत नाही की त्यावेळी मी थोडीशी दुःखी होते, की मला परमेश्वरात पूर्णपणे सामावून जावेसे वाटत होते. अंतःकरणापासून मी परमेश्वराशी बोलले, मी म्हणाले, "हे प्रिय परमात्मा, कृपया मला तुझ्या मिठीत घे!" जेव्हा मी त्राटक संपवून डोळे मिटले तेव्हा मला जाणवले की अक्षरशः मी एखाद्या बालकासारखी वर ओढली गेले आणि परमेश्वराने मला त्याच्या मिठीत घेतले! माझ्यासाठी ही अगदी अविश्वसनीय व अद्भुत अनुभूती होती! त्या एका क्षणात मी परमेश्वराशी एकरूप झाले व ध्यानाच्या अगदी गहन पातळीत गेले.

आजकाल मला सर्वत्र व प्रत्येक गोष्टीत परमेश्वरी अस्तित्वाची अधिकाधिक जाणीव होत आहे. ह्या जाणिवेने मला माझ्या सभोवती असलेल्या विविध गोष्टींशी अधिक जोडले आहे. मी आता पुष्कळ शांत झाले आहे. साधनेच्या ह्या टप्प्यात इतरांशी होणारा माझा संवाद जरी कमी झाला असला तरी मी समाधानी आहे व माझ्यात पूर्णतेची भावना आहे! ध्यान करताना एका पातळीवर मी गहन स्तब्धता व विस्तीर्णतेशी जोडली जाते तर त्याचवेळी दुसऱ्या पातळीवर भोवतालच्या वस्तुस्थितीची जाणीव देखील मला असते.

– विद्या वीरकर

मी मानसा फाऊंडेशनला एक छोटी रक्कम देणगी म्हणून दिली होती. तर काय आश्चर्य! त्याच्या पुढच्याच आठवड्यात मला नेमकी तेवढीच, खरे तर त्याहूनही थोडीशी जास्तच रक्कम, मी केलेल्या माझ्या कार्यालयातील कामाच्या कौतुकाखातर बक्षिसाच्या रूपात मला मिळाली. हे मला अजिबात अपेक्षित नव्हते! मला वाटते की ऋषी आपल्यावर लक्ष ठेवून आहेत व जीवनाच्या प्रत्येक पैलूत आपली उन्नती घडवून आणत आहेत. ह्या सप्तर्षी मार्गात असणे हा माझ्यासाठी मोठा आशीर्वाद आहे असे मला वाटते.

माझ्या कार्यालयाने सोपवलेल्या एका ग्राहकासंबंधित काम हाताळताना मी सुरुवातीलाच अडखळले होते. मग रात्री उशीरा मी प्रकाश प्रवहन करण्यास सुरुवात केली आणि त्याच्या कृपेने मला काम पूर्ण करण्यास आवश्यक सर्व पूर्वापेक्षित गोष्टी मिळाल्या. मला अत्यानंद झाला आणि जाणवले की आपल्याला फक्त आध्यात्मिक पातळीवरच मार्गदर्शन व सुरक्षा मिळते असे नाही तर भौतिक जीवनाच्या प्रत्येक पैलूत ती उपलब्ध आहे.

– लावण्या बी.

मी माझ्या लहान मुलीला प्रेम पाठविण्याचा प्रयत्न केला. ती खूपच संवेदनशील आहे. लोकांच्या भावनांचा तिच्यावर खूप जास्त प्रभाव पडतो व त्याचा परिणाम तिच्या खाण्यापिण्यावर होतो. तिला अव्यवस्थित जेवणाच्या सवयी संदर्भातील विकार वगैरे जडेल की काय ह्याची मला चिंता वाटते. म्हणून मी तिला दररोज प्रकाश पाठविण्यास सुरुवात केली. आता तिच्या जेवणाच्या सवयीत सुधारणा होत आहे.

– हिना रायकर

मी पूर्णपणे शांत असतो. मी नेहमी प्रेम व शांती अनुभवतो. बाह्य परिस्थिती जरी मला विचलित करण्यासारखी असेल तरी देखील ९९% वेळा मी विचलित होत नाही.

– प्रेम आनंद एन.

चेहऱ्यावर स्मित असलेला गुरुजींचा एकही फोटो मी पाहिला नव्हता. जेव्हाही मी गुरुजींच्या फोटोकडे पाहायचे तेव्हा मला वाटायचे की ते माझ्यावर रागावले आहेत. नंतर यूट्यूबवर मला गुरुजींचा एक व्हीडियो सापडला. त्यात ते अतिशय सुंदर स्मित करताना दिसले. ज्यावेळी मी ते पाहिले त्याच क्षणी माझ्या मनात विचार डोकावला, "मी तुझ्यावर रागावलेलो नाही." मला त्यांच्या नजरेत खूप प्रेम व दयाभाव जाणवला. मला भारमुक्त झाल्यागत व अत्यानंद ह्या दोन्ही गोष्टी जाणवल्या. या दैवी व्यक्तीचे आपल्याकडे लक्ष आहे, ह्याचाच हा पुन्हा मिळालेला संकेत होता. मला धन्य झाल्यासारखे वाटले. ह्याच बरोबर मला आपल्या विचारांच्या शक्तीची देखील जाणीव झाली.

– अश्विनी के.

जेव्हा दैनंदिन जीवनात आपली ध्यानसाधना नियमित होते, तेव्हा काळ व स्थान ह्या दोहोंमध्ये खूप बदल होतो. सर्वत्र, आपल्या भोवती असलेल्या प्रत्येक अणुमध्ये स्थित परमेश्वरी उपस्थिती आपल्याला ह्या गोष्टीची जाणीव करून देते की प्रत्येक जागा पावन आहे आणि ती प्रत्येकाची आहे. त्याचप्रमाणे जेव्हा प्रत्येक क्षणांत आपल्याला परमेश्वराची उपस्थिती जाणवते तेव्हा प्रत्येक क्षण पवित्र व आपल्याकरिता महत्वाचा होतो.

– सुलोचना रामास्वामी

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560077 and
Printed at M/s. ART PRINT, 719/A, West of Chord Road, 2nd Stage, Rajajinagar, Bangalore - 560086. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande